# वाचन प्रेरणादिनी आज पुस्तक खरेदीची पर्वणी

**पुणे :** सरकारने घोषित केलेल्या वाचन प्रेरणा दिनामुळे वाचकांना पुस्तक खरेदीची पर्वणी अनुभवता येणार आहे. माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त राज्य सरकारने हा दिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून घोषित केला आहे.

बुकगंगा इंटरनॅशनल बुक सर्व्हिसच्या दालनात सर्व प्रकारच्या पुस्तकांवर २५ टक्के सवलत आहे. ऑनलाइन खरेदीवर २० टक्के सवलत जाहीर करण्यात आली. अक्षरधारा बुक गॅलरीच्या वतीने साहित्य संमेलनाध्यक्ष निवडणुकीच्या उमेदवारांशी साहित्य संमेलन या विषयावर गप्पांचा कार्यक्रम सायंकाळी सहा वाजता आहे. डॉ. कलाम यांच्या सर्व पुस्तकांवर २५ टक्के व इतर पुस्तकांवर २० टक्के सवलत आहे. कोथरूड येथील शब्दनाद या पुस्तक दालनातही २५ टक्के सवलत आहे. मॅजेस्टिकच्या दालनात पुस्तकांवर २० टक्के व डॉ. कलाम यांच्या पुस्तकांवर २५ टक्के सवलत आहे. शासकीय ग्रंथालयाच्या वतीने पुस्तक प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. जिल्हा ग्रंथालयात दहा ते सायंकाळी पाच या वेळेत हे प्रदर्शन आहे.